


दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com  RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे  अंक : २६० वा  शनिवार दि २७ डिसेंबर २०२५  पृष्ठ ८  किंमत ३ रुपये

# भाजपसोबत बोलणी फिस्कटली तर शिंदेंचा प्लॅन बी तयार, पुण्याच्या राजकारणात धमका...

**वृत्तसंस्था/ पुणे**

पुण्याच्या राजकारणात सध्या प्रचंड अभूतपूर्व अशा घडामोडी घडताना दिसत आहेत. एकीकडे पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येत असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. तशा घडामोडी पुण्यात घडताना दिसत आहेत. तसेच पुण्यात शिवसेना आणि भाजपच्या गोटातही मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. महापालिका निवडणुकांची घोषणा झाली त्याचदिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात शिवसेना आणि भाजपची युती होईल, असं सुतोवाच केलं होतं. पण भाजपकडून जितक्या जागांचा प्रस्ताव मिळत आहे ते पाहून शिवसेनेत नाराजी पसरल्याची माहिती आहे. भाजपकडून पुण्यात शिवसेनेला केवळ १५ जागांचा प्रस्ताव देण्यात आल्याची चर्चा आहे. यामुळे शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच नाराज शिवसैनिकांनी आज नीलम गोऱ्हे यांच्या घराबाहेर आंदोलनदेखील केलं आहे. गोऱ्हे यांनी भाजपला ६० जागांचा प्रस्ताव पाठवल्याची देखील माहिती आहे. या सगळ्या घडामोडींदरम्यान शिवसेनेचा आणखी एक बडा नेता पुण्यात महायुतीसाठी प्रयत्न करत आहे. ते नेते म्हणजे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत. पुण्यात भाजप आणि शिवसेनेच्या जागावाटपाचा तिढा शोडवण्यासाठी आज महत्त्वाच्या हालचाली घडल्या आहेत. पुण्यातील भाजपचे निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यांची शिवसेनेचे मंत्री उदय सामंत आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांच्यात चर्चा झाली आहे. पुण्यातील भाजप-शिवसेना युतीच्या चर्चा अंतिम टप्प्यात आहेत. निलम गोऱ्हे यांनी काल ६० उमेदवारांना तयारी करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आज स्वतः उदय सामंत यांनी वर्षा बंगल्यावर जात युतीच्या जागा वाटपावर अंतिम तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यामुळे आता अंतिम तोडगा निघतो का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.



भाजपकडून सन्मानपूर्वक जागा मिळाल्या नाहीत तर शिवसेना आपला प्लॅन सक्रीय करणार असल्याचीदेखील चर्चा आहे. पुण्यातून महायुतीतील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. भाजपसोबत महायुतीच्या जागावाटपाची चर्चा फिस्कटल्यानंतर शिवसेना आपला प्लॅन नुसार, पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत युतीची चाचपणी सुरु करणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे दोन्ही पक्षांमध्ये संवाद सुरू असल्याची माहिती आहे. भाजप शिवसेनेला सन्मानजनक जागा द्यायला तयार नाही. त्यामुळे राष्ट्रवादीकडून शिवसेनेसोबत चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. पुण्यातील शिवसेनेचा एक मोठा नेता यासंदर्भात प्रस्ताव घेऊन एकनाथ शिंदे यांच्या भेटीला गेल्याची माहिती आहे. अजित पवारांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना पुणे महानगर पालिका एकत्र लढवण्यासंदर्भात चर्चा पडद्यामागे सुरु असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# मेहकर येथे माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन व वीर बाल दिन साजरा

**जनसंचलन/मेहकर**

एम. इ.एस. हायस्कूल मेहकर येथे आज दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यासोबतच वीर बाल दिन हा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून एम.इ. एस. हायस्कूल मेहकर चे प्राचार्य किंबहुणे तर प्रमुख वक्ते म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष मा. आमदार विजयराव शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष तथा संयोजक चंद्रकांत बर्दे, जिल्हा सचिव विजय पवार, तालुकाध्यक्ष सारंग माळेकर, शहराध्यक्ष सौ. शिल्पा देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विजयराव शिंदे म्हणाले की, अटल बिहारी वाजपेयी यांनी देशाला सक्षम बनवण्याकरिता महत्त्वाची कामगिरी बजावली. एक उत्कृष्ट



पत्रकार, लेखक, कवी, वक्ता, आणि नेता म्हणून त्यांची छवी संपूर्ण देशात होती. पंतप्रधान असताना ते अमेरिकेसमोर न झुकता त्यांच्याच कार्यकाळात अणुबॉम्ब चाचणी करून करून देशाला सुरक्षित करण्याचे काम केले. त्यांचे आचार विचार आजच्या पिढीने घ्यावे असे आवाहन विजयराज शिंदे यांनी केले. वीर बाल दिनावर बोलताना विजयराज शिंदे म्हणाले की, सिख समाजाचे दहावे गुरु गोविंद सिंग व त्यांच्या परिवाराने धर्म, देश रक्षणाकरिता आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांचे दोन पुत्र रणांगणात विरगतीला प्राप्त झाले. तर वीर जोरावर सिंग आणि वीर फतेहसिंग यांना मोगलांनी जिवंतपणी भिंतीमध्ये पुरून त्यांचे प्राण घेतले. परंतु दोन्हीही वीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली परंतु धर्म परिवर्तन करण्याकरिता नकार दिला अशा शूरवीर पालकांकडून आजच्या विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा असे आवाहन यावेळी विजयराज शिंदे साहेब यांनी केले. या कार्यक्रमाला शेकडो विद्यार्थी, शिक्षक व भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# महायुतीचा महाविजय...



पैशांकडे पैसा जातो; तद्वतच सत्तेकडे सत्ता जाते, याचे प्रत्यंतर राज्यातील नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुकीत आले आहे. सरकार स्थापनेनंतर वर्षभराने आलेल्या या निवडणुका सत्ताधारी महायुतीने दणदणीत बहुमताने जिंकून विधानसभेच्या निकालांची पुनरावृत्ती केली आहे; त्यातही भारतीय जनता पक्षाने महायुतीमध्येसुद्धा आपणच महाशक्ती असल्याचे दाखवून दिले. २८८ जागांपैकी भाजपने सर्वाधिक, म्हणजे सुमारे सव्वाशे, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५०हून अधिक, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ४० ठिकाणी विजय मिळवला आणि महायुतीची गोळाबेरीज विधानसभेइतकीच असल्याचे दिसून आले. या निवडणुकीत विरोधकांचा पुन्हा सफाया झाला. काँग्रेसने ३५-४० पर्यंत मजल मारली; तर राष्ट्रवादी काँग्रेस (शप) आणि शिवसेना (उबाठा) यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कशीबशी दोन आकडी संख्या गाठता आली. या निवडणुका स्थानिक पातळीवर लढवल्या गेल्या असून, अनेक पक्षांचे झेंडेही नावापुरतेच असल्याने आकड्यांबाबत परस्परविरोधी दावे आहेत; तरीही महायुतीचा महाविजय आणि विरोधकांचे पानिपतफ हे निकालांतून समोर आलेले सर्वमान्य वास्तव ठरते. राज्यातील छोट्या शहरांमध्ये पार पडलेल्या या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका मानल्या जातात. मात्र, करोनासाथीचा काळ आणि नंतर इतर मागासवर्गाच्या आरक्षणाचा तिढा यामुळे मुदत उलटून गेल्यावरही येथे प्रशासकांचे राज्य होते. या काळात अस्वस्थ स्थानिक नेतृत्वामध्ये प्रचंड चुरस दिसली. अनेकांचे पक्ष आणि नेत्यांच्या निष्ठांची सरमिसळ झाल्याचे निवडणुकीतून दिसले. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील कोणत्या पक्षाचे नेते कोणाच्या बाजूने निवडणूक लढवत आहेत, हे समजण्यापलीकडचे ठरले. मित्रपक्षांच्या विरोधात जाऊन विरोधकांना मिळालेल्या नेत्यांपैकी काहींनी आपले अस्तित्व दाखवून दिले, तर काहींना मतदारांनी नाकारले. सत्ताधारी भाजपने सव्वाशे ठिकाणी विजय मिळवून अपेक्षेप्रमाणे आपला वरचष्मा दाखवून दिला. विदर्भातील नागपूर भागात विजय मिळवताना चंद्रपूरसारख्या ठिकाणी मात्र काँग्रेसने भाजपला धक्का दिला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही कोकणासह अन्य भागांमध्ये अर्धशतकी कामगिरी केली. अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यासह अन्य काही ठिकाणी वर्चस्व राखले. या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतील नेत्यांवर घराणेशाहीचे आरोप झाले. अनेक मंत्री आणि आमदारांच्या कुटुंबीयांचा बिनविरोध विजय, हे अर्थातच राजसत्तेच्या वापराशिवाय शक्य नाही; परंतु त्यातून निष्ठावान कार्यकर्ते अन्यायाचे बळी ठरले. विजयाच्या जल्लोषात त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले, तरी भविष्यात हे महागात पडू शकते, याची जाणीव ठेवली पाहिजे. नांदेडमधील लोहासारख्या ठिकाणी भाजपच्या नेत्यांच्या कुटुंबातील सहा जणांना घरी बसवून जनतेने याची झलक दाखवलीच आहे. गेले काही दिवस मतदारांना तीर्थस्थळांच्या यात्रा घडवण्यापासून ते मताला चार-पाच हजार रुपये देण्यापर्यंत चर्चेत आलेल्या अनेक कथा लोकशाहीची चाड असणाऱ्या नागरिकांच्या चिंतेत भर घालणाऱ्या आहेत. राज्याच्या अर्धशहरी भागांमध्ये आता लोकप्रतिनिधींची राजवट सुरू होणार असून, आता तरी गटबाजी-मोठेपणा बाजूला ठेवून विकासाच्या दिशेने कारभार सुरू होईल, ही अपेक्षा आहे. महापालिकांच्या निवडणुकांची उपांत्य फेरी मानल्या गेलेल्या या निवडणुकांमध्ये मिळालेल्या विजयाने महायुतीला आणखी बळ आल्यास नवल नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसनेही आपले अस्तित्व राखले, त्यासाठी शिंदे आणि अजित पवार यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना ताकदही दिल्याचे दिसले. दुसरीकडे ङ्गया निवडणुकीत धनशक्ती आणि सरकारी यंत्रणांचा मोठा वापर झाला,फ असा आरोप काँग्रेसच्या नेत्यांनी केला आहे. या आरोपात तथ्य असले, तरी विरोधकांच्या पाडावाचे ते एकमेव कारण नव्हे. विधानसभेच्या निवडणुकीत बसलेल्या फटक्यानंतर विरोधक अद्याप सावरलेले नाहीत, हा त्याचा सरळ अर्थ आहे. भाजपचे नेते ठिकठिकाणी प्रचारासाठी फिरत असताना काँग्रेस, शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाने ही निवडणूक स्थानिक कार्यकर्त्यांवरच सोडून दिल्याचे चित्र आहे. आता महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. या निवडणुकांमध्येही ङ्गउबाठाफ्चे लक्ष राज्यापेक्षाा मुंबईकडेच जास्त दिसते. ताज्या निकालाने सत्ताधाऱ्यांना बळ देतानाच विरोधकांना एकीचा संदेश दिला आहे; त्यातून विरोधक काही शहाणपणा शिकणार, की अजूनही गटबाजीचाच कित्ता गिरवत बसणार, यावर महापालिकांमधील त्यांचे अस्तित्व अवलंबून आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# महायुतीच्या नेत्यांची गुप्त बैठक अन राष्ट्रवादीला पत्ताच नाही, जळगावात पडद्यामागे काय सुरु?

**जळगाव :** सध्या निवडणुकांचा निकाल लागून चार दिवस उलटले आहे आणि नगर परिषदेच्या निकालांमध्ये अनेक प्रस्थापितांना धक्के सहन करावे लागले आहेत. विशेष म्हणजे भाजपला मोठा धक्का मानावा लागला आहे. पण जळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपला धक्का लागू नये म्हणून महायुतीचे घोंगडे नाचू लागलेले आहेत. भाजप आणि शिवसेना या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक जळगावच्या एका हॉटेलमध्ये सायंकाळी पार पडली. या बैठकीला जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार किशोर पाटील यांची उपस्थिती होती. या बैठकीबाबत अत्यंत गुप्तता पाळण्यात



आली होती. मात्र प्रसारमाध्यमांच्या कॅमेरातून ही बैठक देखील सुटली नाही.या बैठकीला भाजप आणि शिवसेना हेच प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. मात्र त्यांचा मित्रपक्ष असलेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला साधे या बैठकीचे निमंत्रण देखील देण्यात आले नव्हते. या बैठकीत जागा वाटपाची देखील चर्चा झाली असल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला या बैठकीचे साधे निमंत्रण देखील दिले नव्हते. त्यामुळे या बैठकीत दोनच पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी जळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात चर्चा केली आणि जागा वाटपाचा फार्म्यूलाही जवळपास निश्चित झाला असल्याची माहिती आहे. मात्र यात अजित पवारांच्या पक्षाला अवघ्या चार जागांवर समाधान मानावे लागेल, अशी देखील चर्चा आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने २५ जागांचा प्रस्ताव भारतीय जनता पार्टीकडे दिला आहे. भारतीय जनता पार्टी त्यांचा हा प्रस्ताव मान्य करणार नाही इतके मात्र निश्चित आहे.भाजप शिवसेनेच्या युतीनंतर सायंकाळी आमदार मंगेश चव्हाण यांनी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. या बैठकीला स्थानिक आमदार म्हणून असलेले सुरेश भोळे यांची त्या ठिकाणी अनुपस्थिती होती किंवा त्यांना त्या ठिकाणी निमंत्रण दिले नसावे. मात्र आमदार मंगेश चव्हाण यांनी संजय पवार यांचे मोबाईलवर संभाषण करून दिले. पण पवार हे २५ जागांवर आग्रही असून तळजोडीअंती जवळपास १२ जागा मिळाव्यात हा राष्ट्रवादी पक्षाचा आग्रह असेल. पण राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला भाजप अवघ्या ४ जागा देण्यास तयार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

## दोन्ही राष्ट्रवादीच्या आघाडीची मुरलीधर मोहोळांनी उडवली खिल्ली

**पुणे :** पुणे महानगर पालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली असून युती आघाड्यांचे राजकारण देखील सुरू झालं आहे. भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची एकीकडे युती होत असताना दुसरीकडे दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चा देखील सुरू आहेत. मात्र दोन्ही राष्ट्रवादीच्या संभाव्य युतीवर पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शेलक्या शब्दात टीका केली आहे.भाजपची काल रात्री उशिरा एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत भाजपच्या पहिल्या यादीवर अंतिम चर्चा करण्यात आली आहे. या बैठकीनंतर पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रतिक्रिया दिली. मात्र मोहोळ यांच्या या प्रतिक्रियेनंतर पुण्यात दादा विरुद्ध अण्णा असा नवा वाद रंगण्याची शक्यता आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीच्या चर्चा सुरु आहेत. यावर मुरलीधर मोहोळ यांना प्रश्न



विचारला असता ते म्हणाले, 'भाजपच्या विरोधात सगळे एकत्र येत आहेत. दोन राष्ट्रवादी एकत्र येत असल्या तर त्यांना शुभेच्छा आहेत. पण पुणेकरांनी भाजपला भक्कम साथ आहे. गेल्या ३ निवडणुकीत आम्हाला पुणेकरांनी साथ दिली. तसंच वातावरण यावेळेस सुद्धा दिसतंय आणि म्हणून काय करायचं तर सगळे एकत्र लढू असं समोरच्यांचं ठरलेलं दिसतंय. याचा अर्थ असा की पैलवान मजबूत ताकदवान आहे म्हणून सगळे छोटे छोटे पैलवान एकत्र येत आहेत.' मुरलीधर मोहोळ यांच्या या प्रतिक्रियेतून त्यांनी अजित पवारांसह इतर पक्षातील नेत्यांना अप्रत्यक्षपणे त्यांनी छोट्या पैलवानांची उपमा दिल्यामुळे पुण्यात पुन्हा एकदा दादा विरुद्ध अण्णा अर्थात अजित पवार विरुद्ध मुरलीधर मोहोळ असा वाद पाहायला मिळू शकतो.

## ठाकरे बंधूंची युती, जागा जिंकणार किती?

**मुंबई :** अखेर ठाकरे बंधूंनी काल त्यांची युती जाहीर केली. पाच ते सहा महिन्यांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या गाठीभेटी वाढल्या होत्या. तेव्हापासून त्यांच्या युतीच्या चर्चा जोर धरु लागल्या होत्या. अखेर २४ डिसेंबरला दोन्ही नेत्यांनी युतीची घोषणा केली. त्यामुळे मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप, शिवसेना यांची महायुती विरुद्ध ठाकरे बंधू असा थेट संघर्ष होईल. ही निवडणूक ठाकरे बंधूंच्या राजकीय भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. या पार्श्वभूमिवर व्होट वाईब इंडियाचे संस्थापक असलेल्या अमिताभ तिवारी यांनी काही लक्षवेधी आणि महत्त्वाचे आकडे समोर आणले आहेत.गेल्या वर्षी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या. लोकसभेत महायुतीनं सपाटून मार खाल्ला. मुंबईतही त्यांची पिछेहाट झाली. महाविकास आघाडीनं राज्यात ४८ पैकी ३० जागा जिंकल्या. मुंबईतील ६ पैकी ४ जागा मविआनं खिशात घातल्या. तर महायुतीला केवळ २ जागांवर समाधान मानलं.

## ठाकरे बंधूंना शिंगावर घेण्याची भाईची तयारी; पण 'त्या' जागा नकोशा

**मुंबई :** ठाकरे बंधूंनी आगामी महापालिका निवडणुकीसाठी युतीची घोषणा केलेली आहे. तब्बल २० वर्षांनी राजकीयदृष्ट्या सोबत आलेल्या ठाकरे बंधूंसमोर आता महायुतीचं आव्हान असेल. सत्ताधारी भाजप आणि शिवसेना यांच्याकडून सातत्यानं बैठकांचं सत्र सुरु आहे. पण अद्याप तरी त्यांचं जागावाटप निश्चित झालेलं नाही. सगळ्याच महापालिकांसाठी चर्चेच्या फेऱ्या झडत आहेत. पण जागावाटपाचं सूत्र ठरलेलं नाही. मुंबईतील २२७ पैकी २०० जागांवर त्यांचं एकमत झालं आहे. उर्वरित जागांवर पेच कायम आहे.उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात पाच तास चर्चा झाली. एमएमआर भागात येणाऱ्या महापालिकांमधील जागावाटपाच्या संदर्भात दोन्ही नेत्यांची मॅरेथॉन बैठक झाली. मंगळवारी रात्री सुरु झालेली चर्चा बुधवारी पहाटेपर्यंत चालली. यानंतर बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा झाली. महायुतीच्या मतांचं विभाजन टाळण्यासाठी फडणवीस राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांसोबतही चर्चा करणार आहेत.मुंबईत भाजप शिवसेनेला ८५ ते ९५ जागा सोडण्यास तयार आहे. याआधी भाजपनं सेनेला ५२ जागांचा प्रस्ताव दिला होता. शिवसेनेकडून तो अमान्य करण्यात आला. शिवसेना निम्म्या जागांसाठी आग्रही आहे. शिवसेना उबाठा आणि मनसे लढवत असलेल्या मराठीबहुल प्रभागांसाठी शिवसेना अधिक आग्रही आहे. शिंदे यांना त्या जागा हव्या आहेत. आपल्याकडे १२५ माजी नगरसेवक असल्याचं शिवसेनेकडून सांगण्यात आलं आहे. यातील ५५ जण २०१७ मध्ये विजयी झालेले आहेतमराठी मतदारांचा भरणा असलेल्या प्रभागांसाठी एकनाथ शिंदे आग्रही आहेत. या भागांमध्ये त्यांची लढत थेट ठाकरे बंधूंशी होईल. तर भाजप अमराठी मतदार असलेल्या भागांमध्ये लढण्यास अधिक उत्सुक आहे. उत्तर भारतीय, गुजराती, मारवाडी मतदार अधिक असलेल्या प्रभागांमध्ये भाजपचे उमेदवार असतील.

## पवार काका पुतण्याची एक चाल अनब मविआच्या गोटात अनपेक्षित गोंधळ

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात पडद्यामागे प्रचंड राजकीय घडामोडी सुरु आहेत. पुणे महापालिका निवडणुकीत कुणाची युती आणि कुणाची आघाडी होईल? याकडे सर्वांचं लक्ष आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत एकत्र निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे पुण्यात दोन्ही पक्ष एकत्र निवडणुकीला सामोरं जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांचा प्रश्न सुटला. तसेच निवडणुका जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात भाजपची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत युती होईल, असं जाहीर केलं होतं. पण इथे जागावाटपावरुन शिवसेना आणि भाजपचं पूर्णपणे ठरलेलं नाही. तर दुसरीकडे महायुतीतला तिसरा घटकपक्ष फडणवीसांच्या घोषणेनंतर एकटा निवडणुकीला सामोरं जाणार असल्याची माहिती समोर आली. पण यानंतर वेगळ्या घडामोडी पुण्यात



घडताना दिसल्या.पुणे जिल्हा आणि अजित पवार यांचं वेगळं नातं आहे. ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री देखील आहेत. त्यांचा तो बालेकिल्ला आहे. असं असलं तरी भाजप आणि शिंदेंची शिवसेना हे एकत्र निवडणूक लढणार असल्याने अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पुढे मोठं चॅलेंज आहे. अशा काळात आपल्या समविचारी पक्षांना सोबत घेणं हा या पर्यायाचा अजित पवारांची राष्ट्रवादी विचार करु लागली. यातूनच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा समोर आली. हीच चर्चा आगामी काळात खरी होण्याची शक्यता मानली जात आहे. याबाबत थेट घोषणा होऊ शकते किंवा दोन्ही राष्ट्रवादींमध्ये परस्पर सहमतीने उमेदवार दिले जाऊ शकतात, अशी चर्चा समोर आली.एकीकडे या दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा समोर आल्याने महाविकास आघाडीत मोठा गोंधळ उडताना बघायला मिळाला. विशेष म्हणजे ठाकरे बंधू तर एकत्र येताना दिसत आहेत.

त्यांची पुण्यातही युती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाचे नेते आणि पदाधिकारी विचारात पडले. आघाडीत लढायचं की स्वतंत्र लढायचं याबाबतचं द्वंद्व काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांमध्ये होता. विशेष म्हणजे अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत निवडणूक लढण्यास विरोध करणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्याने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढणार असल्याचं जवळपास फिक्स असल्याची चर्चा आहे. पण त्याची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. यानंतर आता काँग्रेसनेदेखील मोठा निर्णय घेतला आहे.पुणे महापालिका निवडणूक स्वबळार लढवायची, असा निर्णय आता काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी घेतला आहे. काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी काँग्रेस पुणे महापालिका स्वबळावर लढणार असल्याची माहिती दिली. 'पक्षश्रेष्ठींचा निरोप आला आहे, पुण्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी युती करू नका. ठाकरे आणि इतर कोणी येत असेल तर चर्चा करा. मात्र अजित पवारांशी युती करू नका', अशी माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी दिली. काँग्रेसच्या या निर्णयाने आता अजित पवार आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या युतीचा मार्ग मोकळा झाल्याचीदेखील चर्चा आता शहरात होऊ लागली आहे.

# तुझ्या लेकीशी लग्न लावून दे.. आईचा नकार; तो संतापला, बाटली घेतली, पेट्रोल ओतलं महिलेला पेटवल

**बंगळूरू :** तरुणाने एका महिलेकडे तिच्या मुलीच्या लग्नाची मागणी केली. मात्र, या महिलेने मुलीचे लग्न लावण्यास साफ नकार दिला. त्यानंतर या तरुणाने महिलेवर पेट्रोल ओतून तिला पेटवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर महिलेला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी तरुण सध्या फरार असून शोध सुरू आहे. या भयंकर घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.बंगळूरूच्या बसवेश्वरनगर येथील भोवी कॉलनीमध्ये राहणाऱ्या एका महिलेने तिच्या मुलीचे लग्न एका तरुणाशी करण्यास नकार दिला. आपली मागणी नाकारल्याने संतापलेल्या




तरुणाने तरुणीच्या आईवर पेट्रोल ओतले आणि तिला पेटवले. महिला आगीच्या ज्वाळांनी वेढली गेली, ती वेदनेने ओरडत हेती.यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. आवाज ऐकून आसपासचे लोक जम ले आणि त्यांनी महिलेला तातडीने व्हिक्टोरिया रुग्णालयात दाखल केले.जखमी महिलेचं नाव गीता (वय ४५) आहे तर, आरोपी तरुणाचं नाव मुथू (वय २८) असल्याची माहिती आहे. गीता या किराणा दुकान चालवतात. तर मुथू त्याच परिसरात चहाचा टपरी चालवतो. आरोपी मुथू आणि महिलेची १९ वर्षांची मुलगी हे दोघे एकमेकांना ओळखतात. मुथूने गीताच्या १९ वर्षांच्या मुलगी जी बीबीएची दुसरी वर्षाची विद्यार्थिनी आहे, तिच्याबाबत प्रेम व्यक्त केले होते. मात्र, मुलीने त्याचा प्रस्ताव नाकारला. तेव्हा मुथूने गीतावर लग्नासाठी दबाव आणला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री १ वाजता मुथू आणि गीतामध्ये या मुद्द्यावरून भांडण झाले. गीताने पुन्हा नकार दिल्यावर मुथू संतापला. त्याने जवळच असलेल्या बाटलीतून गीतावर पेट्रोल ओतले आणि तिला पेटवून दिले. मुथू अनेकदा आपत्कालीन परिस्थितीत असे पेट्रोल ठेवत असे. गीताच्या ओरड ऐकून तिची मुलगी घटनास्थळी धावत आली, परंतु तोपर्यंत अभिमन्यू घटनास्थळावरून पळून गेला होता.याप्रकरणी बसवेश्वरनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मुथूवर कठोर कारवाई करण्याची मागणी कुटुंबीय आणि स्थानिकांकडून केली जात आहे.

गीताचे पती विजय कुमार यांचे काही वर्षांपूर्वी निधन झाले होते. ते सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर होते. आता गीता तिच्या मुलीसोबत एकटी राहते आणि किराणा दुकानातून आपला आणि मुलीचा उदर्निवाह चालवते.

## तिने मला इन्स्टावर ब्लॉक केलं ; तरुणीला पीजीसमोर गाठलं

**बंगळुरु :** एका तरुणाने २१ वर्षीय तरुणीवर हल्ला करत तिला जीवेमारण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार बंगळुरूमध्ये घडला आहे. या घटनेत तरुणी गंभीर गंभीर जखमी झाली आहे.ही घटना बंगळुरुतील उल्लाल मेन रोडवरील ज्ञानज्योतीनगरमध्ये घडल्याची माहिती आहे. याप्रकरणी पीडितेने पोलिसात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी नवीन कुमार एन याला अटक केली आहे. तो मूळचा येलहंका जवळील बिलमरनहळ्ळी येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. तो बेरोजगार आहे.पीडिता मूळची चिक्कमंगळुरू जिल्ह्यातील शृंगेरी येथील राहणारी आहे. ती सुमारे दोन वर्षांपूर्वी बेंगळुरूला स्थायिक झाली होती आणि टेलिमार्केटर म्हणून काम करत होती. पीडितेचे म्हणणे आहे की ती पहिल्यांदा ३० सप्टेंबर रोजी नवीनच्या संपर्कात आली जेव्हा त्याने तिच्या काम ाची जाहिरात करणाऱ्या एका इंस्टाग्राम पोस्टला प्रतिसाद दिला होता. यानंतर दोघांमध्ये संवाद सुरु झाला. पीडितेने सांगितले की नवीनने तिच्याशी फोनवरून वारंवार संपर्क साधण्यास सुरुवात केली. तिने सांगितले की नवीनचे वर्तन पहिले तीन महिने अत्यंत चांगले होते. पण,



नंतर नवीनने तिला प्रपोज केले. तिने नवीनचे प्रपोझल नाकारले. मात्र, यानंतरही नवीन तिचा पाठलाग करत राहिला आणि तिला स्टॉक करत राहिला.नवीनचा छळ सहन न झाल्याने पीडितेने नोकरी सोडली आणि नवीन पीजीमध्येही राहायला गेली. पीडितेने आरोप केला की त्याने तिच्याशी अनेकदा तिला शिवीगाळ केला आणि मारहाण केली.१२ डिसेंबर रोजी दुपारी ३:२० वाजता जेव्हा पीडित तरुणी तिच्या मैत्रिणीसोबत स्कूटरवरून पीजीतून बाहेर पडली तेव्हा नवीनने त्यांच्या गाडीसमोर आपली कार आडवी टाकली आणि त्यानंतर त्याने थेट तिच्यावर हल्ला चढवला. त्याने तिच्या डोक्यावर, पाठीवर आणि मानेवर वार केले. नवीनने तिचे कपडे फाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

## पवारांच्या नगरसेवकाच्या मुलाने आयुष्य संपवलं

**बीड :** शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि मनाला चटका लावणारी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक अशोक काळे यांचा मुलगा पवन अशोक काळे (वय ३२) याने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. बीडमधील जालना रोड परिसरातील काझीनगर भागात ही घटना घडली असून, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पवन काळे यांनी बीड येथील राहत्या घरी गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केली. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घरासमोर मोठी गर्दी केली होती. घटनेचं गांभीर्य ओळखून शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बीडच्या शासकीय रुग्णालयात पाठवला आहे.पवन यांचे वडील अशोक काळे हे नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) कडून 'तुतारी' या चिन्हावर निवडून आले आहेत.

## पिस्तुल काढली अनब.. एकतर्फी प्रेमाने घेतला लेकीचा बळी

**लखनौ :** एकतर्फी प्रेमातून दोघांना आपला जीव गमवावा लागला आहे. एकतर्फी प्रेमातून एका तरुणाने तरुणीची गोळी झाडून हत्या केली. त्यानंतर त्याने स्वत: गळफास घेत आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्यातील बरौत पोलिस स्टेशन परिसरातील महावतपूर बावली गावात घडल्याची माहिती आहे.याप्रकरणी मि ळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मी सैनीची मुलगी गुड्डन घरी टेलरिंगचं काम करायची. तिचे वडील बरौत पोलिस स्टेशनमध्ये चौकीदार आहेत. जवळच राहणारा सतनाम नावाच्या तरुणाचं गेल्या बऱ्याच काळापासून तिच्यावर प्रेम होते. तो गुड्डनवर सतत लग्न करण्यासाठी दबाव आणत होता. सतनाम आणि त्याचे कुटुंब पंजाबमधील एका वीटभट्टीवर काम करतात आणि काही दिवसांपूर्वीच गावात परतले होते.गुरुवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास गुड्डन काही वस्तू खरेदी करण्यासाठी घराबाहेर पडली. घराच्या मागच्या गल्लीत पोहोचताच तिथे सतनामने तिचा मार्ग अडवला. त्या दोघांम ध्ये वाद झाला. त्यानंतर रागाच्या भरात सतनामने गुड्डनच्या डोक्यात पिस्तूलने



गोळी झाडली. गोळी लागताच गुड्डन रक्तबंबाळ अवस्थेत जमिनीवर कोसळली. गोळीबाराचा आवाज येताच परिसरात एकच गोंधळ उडाला.प्रत्यक्षदर्शींच्या मते घटनेनंतर सतनामने स्वत:वर गोळी झाडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, गोळी त्याच्या पिस्तूलमध्ये अडकली. त्यानंतर तो घरी परतला आणि कडुलिंबाच्या झाडाला फाशी घेऊन त्याने आपल्या आयुष्याची अखेर केली. या प्रकरणाती माहिती मिळताच, पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि गंभीर अवस्थेत असलेल्या गुड्डनला सीएचसीमध्ये नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.फॉरेन्सिक टीम घटनास्थळी पोहोचली आणि पिस्तूल जप्त केले आहे. पोलिसांनी सतनामचा मृतदेह झाडावरून खाली उतरवला पंचनामा तयार केला आणि दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत.

# मॅडम, दुसऱ्यांशी बोलू नका, शिक्षिकेला प्रपोज अनब मैत्रिणीला वॉशरुममध्ये 'तो' प्रश्न, 'विद्यार्थिनी'चे प्रताप

**पुणे :** शहरातील एका नामवंत शिक्षण संस्थेत नववीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीच्या विचित्र वागणुकीने सध्या सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. आपल्याच शिक्षिकेच्या प्रेमात पडल्याचा दावा करत या अल्पवयीन मुलीने त्यांना अश्लील मेसेज पाठवणे, स्वत:ला इजा करून घेणे आणि आत्महत्येची धमकी देण्यापर्यंत मजल मारल्याने शाळेत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, शाळा प्रशासन आणि दामिनी पथकाने दाखवलेल्या प्रसंगावधानाने या प्रकरणावर शांततेत पडदा टाकण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थिनी आपल्या शिक्षिकेच्या मोबाईलवर सतत 'आय लव्ह यू' असे संदेश पाठवत होती. 'तुम्ही दुसऱ्या कोणाशीही बोललेले मला खपत नाही,' अशा शब्दांत तिने शिक्षिकेवर मानसिक दबाव निर्माण केला होता. शिक्षिकेने तिला अभ्यासावर लक्ष देण्यास सांगून वारंवार समजावले, परंतु तिचे वर्तन अधिकच हिंसक होत गेले.तिने रागाच्या भरात ब्लेडने स्वत:च्या हातावर शिक्षिकेचे नाव कोरले आणि जर शिक्षिकेने तिच्या प्रेमाचा स्वीकार केला नाही, तर शाळेच्या सातव्या मजल्यावरून



उडी मारून जीवन संपवण्याची धमकी दिली.या विद्यार्थिनीच्या वर्तणुकीचा त्रास केवळ शिक्षिकेलाच नाही, तर तिच्या वर्गमैत्रिणींनाही सहन करावा लागत होता. तिने वर्गातील काही मुलींना प्रेमाचे संदेश पाठवून त्यांच्या बोटात अंगठी घालण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर, एका विद्यार्थिनीला वॉशरूममध्ये गाठून तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल विचारणा करत तिला घाबरवून सोडले. वर्गात लक्ष न देता शिक्षिकेला एकटक पाहत राहणे आणि तासनतास कॉरिडॉरमध्ये फिरणे, अशा तिच्या वागण्यामुळे तक्रारींचे सत्र वाढले होते.पुण्यातील या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून शाळा प्रशासनाने तातडीने दामिनी मार्शलच्या पथकाला पाचारण केले. पोलिसांनी कोणतीही कायदेशीर कठोर कारवाई न करता अत्यंत संवेदनशीलतेने या मुलीला हाताळले. तज्ज्ञांच्या मदतीने तिचे मानसशास्त्रीय समुपदेशन करण्यात आले. पौगंडावस्थेतील मुलांच्या मनात निर्माण होणारे आकर्षण आणि भावनिक गोंधळ यातून हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. योग्य वेळी तिला विश्वासात घेऊन समजावल्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला असून, पालकांनीही आपल्या मुलांच्या बदलत्या वागणुकीकडे लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# स्मृती मानधनाचा मोठा निर्णय, कपिल शर्माच्या शोमध्ये का नाही जाणार, समोर आलं खरं कारण

**नवी दिल्ली :** भारताबरोबर परदेशातही कपिल शर्मा शो हा लोकप्रिय समजला जातो. त्यामुळे बरेच सेलिब्रेटी या कार्यक्रमात जाण्याची वाट पाहत असतात. पण किपल शर्माच्या शेमध्ये आता भारताच्या महिला क्रिकेट संघातील काही खेळाडू जाणार आहेत. पण स्मृती मानधनाने मात्र या कार्यक्रमात न जाण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्याचे कारमही आता समोर आलं आहे.भारताने वनडे वर्ल्ड कप काही दिवसांपूर्वी जिंकला. या वर्ल्ड कपचे सेलिब्रेशन आता कपिल शर्माच्या शोमध्ये होणार आहे. त्यामुळे भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर, जेमिमा, रिचा घोष आणि प्रतिका रावलसारखे खेळाडू कपिल शर्मा



शोमध्ये जाणार आहेत. वनडे वर्ल्ड कपमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा या स्मृती मानधनाच्या नावावर होत्या, त्याचबरोबर ती भारताची उप कर्णधारही आहे. पण तरीही स्मृती मानधनाने या कपिल शर्मा शोमध्ये न जाण्याचा निर्णय का घेतला आहे, हे आता समोर आलं आहे.कपिल शर्मा शोमध्ये बरीच कॉमेडी केली जाते. त्याचबरोबर असे काही खोचक प्रश्नही विचारले जातात, ज्याची उत्तरं फार विचारपूर्वक द्यावी लागतात. त्याचबोरबर या कार्यक्रमात आलेले चाहतेही सेलिब्रेटींना प्रश्न विचारत असतात. स्मृतीने वनडे वर्ल्ड कप चांगलाच गाजवला. प्रत्येक सामन्यात तिने भारताला दमदार सुरुवात करून दिली. त्यामुळेच भारताला हा वर्ल्ड कप जिंकता आला. पण वर्ल्ड कप झाला आणि त्यानंतर स्मृती मानधाना लग्न करणार होती. पण तिचं हे लग्न मोडलं. या धक्क्यामधून ती बाहेर येत आहे. पण या कार्यक्रमात जर तिला लग्नाबाबत काही प्रश्न विचारला गेला, तर तिचं मनसीक संतुलन चांगलं राहील, हे सांगता येणार नाही. सध्याच्या घडीला तरी स्मृती ही सार्वजनिक कार्यक्रमाला जाणे टाळत आहे. जिथे प्रश्न विचारले जाऊ शकतात, तिथे तर स्मृती काही काळ जाणार नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्मृतीने कपिल शर्मा शोमध्ये न जाण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.स्मृती मानधना ही वनडे वर्ल्डकपमध्ये भारताची सर्वोत्तम खेळाडू होती, तरी ती कपिल शर्मा शोमध्ये का जाणार नाही, याचे कारण आता समोर आले आहे.

## हार्दिक पार्टी करून आला अन चाहता त्याच्यावर भडकला

**नवी दिल्ली :** हार्दिक पंड्या सध्या भन्नाट फॉर्मात आहे. हार्दिकच्या आयुष्यात महिका शर्माची एंट्री झाली आणि त्याचं आयुष्य बदलल्याचं पाहायला मिळालं. हार्दिक पंड्या महिका शर्माबरोबर एका पार्टीला गेला होता. पार्टीमधून तो हॉटेलच्या बाहेर पडला आणि त्यानंतर त्याच्यावर चाहता चांगलाच भडकल्याचे पाहायला मिळाले. रागाच्या भरात हा चाहता हार्दिक पंड्याला नेमकं काय म्हणाला, हे एका व्हिडिओमध्ये कैद झालं आहे. हा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल व्हायला लागला आहे.हार्दिक पंड्या काही दिवसांपूर्वी महिला शर्माला डेट करत होता आणि त्यानंतर दोघांनी लग्न केल्याचं म्हटलं जात आहे. भारताचा सामना असताना हार्दिकला पाठिंबा द्यायला महिला मैदानात येते. नुकत्याच झालेल्या वनडे मालिकेत हार्दिकने धडाकेबाज अर्धशतक झळकावलं होतं आणि त्यानंतर त्याने महिकाला खास खूणही केली होती, त्यामुळे हार्दिक सध्या महिलाबरोबर असल्याचे समोर आले. हार्दिस महिलाबरोबर ख्रिसमस पार्टीसाठी एका हॉटेलमध्ये गेला होता. पार्टी संपवून हार्दिक हॉटेलच्या बाहेर आला आणि



त्याला चाहत्यांच्या रागाचा सामना करावा लागला.हार्दिक आणि महिला हॉटेलच्या बाहेर जसे आले, तसे चाहते त्यांच्याजवळ आले. हार्दिकने महिकाला गाडीत बसवले आणि त्यानंतर तो चाहत्यांबरोबर सेल्फी आणि फोटो काढत होता. हार्दिकने काही जणांनाच फोटो काढायला दिले आणि तो निघाला. यावेळी हार्दिकचा एक चाहता त्याच्याबरोबर फोटो काढण्याची विनंती करत होता. पण हार्दिकने त्याला दूर सारले आणि तो गाडीच्या दिशेन जायला लागला. या चाहत्याला हार्दिकबरोबर फोटो न मिळाल्याने त्याचा हिरमोड झाला. पण त्याचवेळी हा चाहता भडकला आणि त्याने हार्दिकबाबत अपशब्द वापरले, जे व्हिडिओमध्ये ऐकायला येत आहेत. हार्दिकने त्या चाहत्याकडे ढुंकूनही पाहिले नाही आणि तो आपल्या गाडीत जाऊन बसल्याचे पाहायला मिळाले.

## रोहित शर्माने पुन्हा जिंकली सर्वांची मनं..

**नवी दिल्ली :** रोहित शर्मा हा फक्त एक गुणी क्रिकेटपटू आणि कर्णधार नाही, तर तो एक चांगला माणूसही आहे. या गोष्टीचा प्रत्यय मैदानत आला. एक विराट कोहलीचा फॅन रोहित शर्माच्या पाया पडण्यासाठी मैदानात धावत आता. पण रोहित शर्माने यावेळी असं काही केलं की, सर्वांची मनं त्याने जिंकली. रोहित शर्माहा हा व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे.रोहित शर्मा विजय हझारे ट्रॉफी खेळण्यासाठी मैदाना उतरला होता आणि चाहत्यांनी त्याला पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. कारण रोहित शर्मा आता भारताकडून फक्त वनडे क्रिकेट खेळतो. त्यामुळे तो जास्त मैदानात दिसत नाही. पण यावेळी तो विजय हझारे ट्रॉफी खेळण्यासाठी जेव्हा मैदानात उतरला होता, तेव्हा चाहत्यांनी त्याचे जोरदार स्वागत केले. रोहितच्या प्रत्येक धावेला चाहते त्याला पाठिंबा देत होते. रोहित शर्माने शतक झळकावलं तर मैदानात एक जल्लोष पाहायला मिळाले. रोहित शर्मानेही यावेळी चाहत्यांना नाराज केले नाही. आपल्या सर्व चाहत्यांना त्याने चारही बाजूंना बॅट उंचावून दाखवली. रोहित शर्माच्या या शतकाच्या जोरावर मुंबईला सिक्कीमच्या संघावर मोठा विजय साकारता आला.

## स्मृतीला जेमिमाने केलं खूष, वाईट काळातून कसं काढतेय बाहेर


**नवी दिल्ली :** मैत्रीण कशी असावी, याचे उत्तम उदाहरण जेमिमा रॉड्रिग्झ असल्याचे आता पाहायला मिळत आहे. कारण आपली खास मैत्रीण स्मृती मानधनाला ती वाईट काळामधून बाहेर काढायला मदत करत आहे. सध्याच्या घडीला या दोघांचे सेलिब्रेशनचे खास फोटो जोरदा व्हायरल झाले आहेत.स्मृतीसाठी जेमिमाह बरंच काही करताना दिसत आहे. भारताने वर्ल्ड कप जिंकला आणि त्यानंतर जेमिमा ही थेट ऑस्ट्रेलियाला बिग बॅश लीग खेळायला गेली होती. बिग बॅशमध्ये तिची दमदार कामगिरी सुरु होती. पण त्याचवेळी स्मृतीचे लग्न होते. त्यामुळे स्मृतीच्या लग्नासाठी जेमिमा ही काही दिवसांची सुट्टी घेऊन भारतात आली होती आणि स्मृतीचं लग्न झाल्यावर ती पुन्हा ऑस्ट्रेलियाला जाणार होती. पण स्मृतीचं लग्न होऊ शकलं नाही. स्मृतीने सुरुवातीला लग्न पुढे ढकललं आणि त्यानंतर तिने आपलं लग्न रद्द केलं. स्मृती त्यावेळी निराश झाली होती. पण आपल्या मैत्रिणीला निराशेच्या गर्तेतून बाहेर काढायला हवं, यासाठी जेमिमाने बिग बॅश लीगमध्ये पुन्हा परतण्याचा निर्णय रद्द केला आणि ती स्मृतीबरोबर राहीली. आपल्या करीअरची



काळजी न करता तिने फक्त स्मृतीचा विचार केला. आता देखील जेमिमा पुन्हा एकदा स्मृतीला आनंदी कसे ठेवता येईल, याचा विचार करत आहे.भारतीय संघ सध्या श्रीलंकेबरोबर टी २० सामने खेळत आहे. पण यावेळी वेळात वेळ काढून जेमिमा स्मृतीला ख्रिसमस सेलिब्रेशनला घेऊन गेली. यावेळी स्मृतीचा चेहरा चांगलाच खुलला होता. स्मृती यावेळी या क्षणांचा आनंद लुटत असल्याचे पाहायला मिळाले. स्मृती आणि जेमिमा यांचा जो फोटो आहे, यावरून हा आनंद सर्वां समजता येऊ शकतो. चाहत्यांनाही हा फोटो आवडला असून त्यामुळेच तो जोरदार व्हायरल झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## रोहित-विराटचा दुसरा सामना कधी व कुठे होणार?

**नवी दिल्ली :** रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात दमदार शतकं लगावली आणि सर्वांच मनं जिंकली होती. पण आता रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा विजय हझारे ट्रॉफीतील दुसरा सामना नेमका कधी आणि कुठे खेळवण्यात येणार आहे, याची माहिती आता समोर आली आहे.रोहित शर्मा विजय हझारे ट्रॉफीतील पहिला सामना हा सिक्कीमबरोबर खेळला होता. या सामन्यात रोहित शर्माने दमदार शतक झळकावले होते आणि त्याने मुंबईच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला होता. या शतकाच्या जोरावर रोहित शर्माने




सामनावीर हा किताबही पटकावला होता. आता रोहित शर्मा विजय हझारे ट्रॉफीतील दुसरा सामना खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. मुंबईचा या स्पर्धेतील दुसरा सामान हा उत्तराखंड या संघांशी होणार आहे. हा सामना २६ डिसेंबर म्हणजेच शुक्रवारी होणार आहे. हा सामना जयपूरमध्ये खेळवण्यात येणार आहे.विराट कोहली गेल्या वनडे मालिकेत दमदार फॉर्मात होता. या मालिकेत त्याने सर्वाधिक धावा केल्या होत्या आणि त्यामुळेच त्याला मालिकावीर हा पुरस्कार मिळाला होता. विराट कोहलीने आपला हा फॉर्म विजय हझारे ट्रॉफीतही कायम ठेवला. कारण विराट कोहलीने या स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात धमाकेदार शतक झळकावले होते. त्यानंतर आता विराट कोहली आपला दुसरा सामना खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. विराट कोहलीच्या दिल्ली संघाचा सामना आता गुजरातच्या संघाबरोबर होणार आहे. हा सामना २६ डिसेंबरला खेळवला जाणार आहे. विराट कोहलीचा हा दुसरा सामना आरसीबीच्या घरच्या मैदानात म्हणजेच बंगळुरु येथे खेळवला जाणार आहे. त्यामुळे या सामन्यासाठी चाहते विराटला पाठिंबा देण्यासाठी जोरदार गर्दी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात शतक पूर्ण केले होते. त्यामुळे आता दुसऱ्या सामन्यात हे दोघेही किती धावा करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# ऑस्करसाठी शॉर्टलिस्ट होमबाउंड वर चोरीचा आरोप

## चंगोइवाला खटला दाखल करण्याच्या तयारीत



**मुंबई :** भारताकडून ऑस्करसाठी दावेदार असलेल्या 'होमबाउंड' चित्रपटावर साहित्यिक चोरीचा मोठा आरोप लागला आहे. लेखिका आणि पत्रकार पूजा चंगोइवाला यांनी करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शन्स आणि नेटफ्लिक्स इंडियावर त्यांच्या २०२१ मध्ये आलेल्या 'होमबाउंड' पुस्तकातून चोरी केल्याचा खटला दाखल केला आहे.

पूजाचे म्हणणे आहे की चित्रपटाचे शीर्षक तिच्या पुस्तकासारखेच आहे. पुस्तकातील दृश्ये, संवाद, कथेची रचना आणि घटनांचा क्रम देखील कॉपी करण्यात आला आहे. दोन्ही कथा कोविड-१९ दरम्यान मजुरांच्या स्थलांतरावर आधारित आहेत. तिने १५ ऑक्टोबर रोजी कायदेशीर नोटीस पाठवली, परंतु निर्मात्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

पूजा मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल करण्याच्या तयारीत आहेत. त्या चित्रपटाच्या वितरणावर बंदी, कॉपी केलेला मजकूर काढून टाकणे, शीर्षक बदलणे आणि नुकसानभरपाईची मागणी करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, चित्रपटाची पटकथा २०२२ मध्ये तयार झाली, जी त्यांच्या पुस्तकानंतर एक वर्षाने आहे, हा योगायोग असू शकत नाही.

धर्मा प्रॉडक्शन्सने सांगितले की, हे प्रकरण कायदेशीर मार्गाने सोडवले जात आहे. या चित्रपटात ईशान खट्टर, विशाल जेठवा आणि जान्हवी कपूर आहेत. दिग्दर्शक नीरज घायवान यांचा हा चित्रपट ऑस्करच्या टॉप १५ मध्ये शॉर्टलिस्ट झाला आहे.

# बायकोच्या ट्रोलर्सना गौरव खन्नाचे उत्तर

## आम्ही दोघेही आमच्या आयुष्यात आनंदी



**नवी दिल्ली :** अलीकडेच बिग बॉस १९ चा विजेता गौरव खन्नाची पत्नी आकांक्षा चमोलाचा एक डान्स व्हिडिओ व्हायरल झाला होता. आकांक्षाला तिच्या डान्समुळे सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. आता गौरव आपल्या पत्नीच्या समर्थनार्थ पुढे आला आहे आणि ट्रोलर्सना उत्तर दिले आहे.

गौरव म्हणाला, 'मी सर्वप्रथम सगळ्यांना सांगू इच्छितो की आकांक्षा ज्या मुलींसोबत डान्स करत होती, त्या माझ्या पब्लिसिस्टच्या टीमच्या सदस्य होत्या.

बिग बॉस दरम्यान त्यांनी खूप मेहनत केली होती आणि ही त्यांची सक्सेस पार्टी होती. मला डान्स करायला जास्त आवडत नाही, म्हणून आकांक्षाने विचार केला की ती त्यांच्यासोबत साम ील होऊन आनंद घेईल.

गौरव पुढे म्हणतो, 'त्यापैकी अनेकांना हे देखील माहीत नाही की ती कोणासोबत नाचत होती. मी फक्त मागे उभा राहिलो आणि तिला आनंद घेऊ दिला, कारण शेवटी हा माझ्या संघाचा विजय होता. माझ्या अनुपस्थितीत त्यांनीच माझ्यासाठी खूप मेहनत केली होती आणि त्यांनाही आनंदी राहण्याचा हक्क आहे.

ट्रोलर्सबद्दल बोलायचं झालं तर, मला त्यांच्यामुळे काही फरक पडत नाही कारण मला माहीत आहे की ते कोणाचे तरी चाहते आहेत. त्यांचाही काहीतरी उद्देश असतो ज्यामुळे कोणालातरी कमी लेखता येईल. मी आणि आकांक्षा आमच्या आयुष्यात खूप आनंदी आहोत.'

गौरव आणि आकांक्षा एका पार्टीत सहभागी झाले होते. जिथे आकांक्षा पबमध्ये प्रवेश करण्यापूर्वीच काही मुलींसोबत डान्स करते. आकांक्षा डान्स करत असताना, गौरव बाजूला उभा राहून पाहतो. नंतर पुढे जाऊन म्हणतो की, आधी प्रवेश तर करा. सोशल मीडियावर व्हिडिओ समोर आल्यानंतर काही युजर्सना आकांक्षाचे डान्स मूव्ह्स आवडले नाहीत. त्यांच्या म ते ते अपमानकारक होते, त्यानंतर लोकांनी आकांक्षाला ट्रोल करायला सुरुवात केली होती.

# ॲनिमल चित्रपट आता जपानमध्ये होणार रिलीज



**मुंबई :** रणबीर कपूरचा सुपरहिट चित्रपट 'ॲनिमल' आता आंतरराष्ट्रीय स्तरावर नवा इतिहास रचत आहे. भारतात प्रचंड यश मि ळवल्यानंतर आता या चित्रपटाची क्रेझ जपानमध्येही पाहायला मिळत आहे. रणबीर कपूर, रश्मिका मंदान्ना आणि बॉबी देओल स्टारर 'ॲनिमल' चित्रपट आता जपानमध्ये रिलीज होणार आहे. भारतातील त्यांच्या प्रचंड यशानंतर आता सातासमुद्रापार चित्रपट रिलीज होण्यासाठी सज्ज होत आहे. भारतात हा चित्रपट रिलीज होऊन २ वर्ष झाली आहेत. आता दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा हा चित्रपट दुसऱ्या देशात रिलीज करण्यास सज्ज आहेत.

रणबीर कपूर अभिनीत 'ॲनिमल' चित्रपटाने भारतात प्रचंड यश मिळवल्यानंतर आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडण्यास सुरुवात केली आहे. निर्मात्यांनी केलेल्या खास घोषणेनुसार हा चित्रपट आता जपानमध्येही रिलीज होणार असून, यामुळे भारतीय सिनेमाच्या जागतिक प्रवासाला नवी दिशा मिळाल्याचे पाहायला मिळत आहे.

ॲनिमल' या चित्रपट रिलीज होताच प्रेक्षकांनी लक्ष वेधून घेतले होते. चित्रपटातील दमदार कथा, जबरदस्त ॲक्शन, भावनिक नातेसंबंध आणि रणबीर कपूरचा प्रभावी अभिनय यामुळे हा सिनेमा मोठ्या प्रमाणावर पसंतीस उतरला होता. भारतासह अनेक परदेशी बाजारातही या चित्रपटाने चांगली कमाई केली आहे.

ॲनिमल चित्रपटाला २ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी रणबीर कपूरचा एक फोटो शेअर केला. त्यामध्ये कॅप्शन लिहिले होते, 'ॲनिमलला दोन वर्षे'. अनिल कपूरने चित्रपटातील अनेक व्हिडिओ तसेच पडद्यामागील काही फोटो देखील शेअर केले होते. या फोटोमध्ये संदीप रेड्डी वांगा रणबीरला शॉट्स समजावून सांगताना दिसले.

# बांगलादेशमध्ये हिंदू युवकाची हत्या, जान्हवी कपूर संतापली



**पुणे :** बांगलादेशमध्ये हिंदूंच्या हत्येमुळे सगळेच संतापले आहेत. अनेक जण सोशल मीडियावर राग व्यक्त करत आहेत. इतर देशांना नेहमी पाठिंबा देणारे बॉलिवूड सेलिब्रिटी आज बांग्लादेशमधील हिंदूंच्या हत्येवर गप्प का अशी अनेकदा सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून तक्रार येत असते. दरम्यान अभिनेत्री जान्हवी कपूर पुढे आली आहे. तिने स्टोरी शेअर करत घटनेचा निषेध केला आहे.

जान्हवी काय म्हणाली वाचा

१८ डिसेंबर रोजी बांग्लादेशमध्ये हिंदू युवक दीपू चंद्र दासची क्रूर हत्या झाली. भारतातूनही या घटनेचा निषेध दर्शवला होता. आता अभिनेत्री जान्हवी कपूरने स्टोरी शेअर करत राग व्यक्त केला आहे. तिने लिहिले,'बांग्लादेशमध्ये जे घडतंय ते अत्यंत क्रूर आहे. हा नरसंहार आहे आणि हे काही पहिल्यांदा घडलेलं नाही. जर तुम्हाला या अमानवी सार्वजनिक हत्येविषयी माहित नसेल तर वाचा, व्हिडीओ पाहा आणि प्रश्न विचारा. आणि एवढं करुनही तुमच्या मनात संताप निम ़ण झाला नाही तर एक दिवस हाच ढोंगीपणा आपल्या सर्वांना नष्ट करेल.'

ती पुढे लिहिते, 'जगात दुसऱ्या कोपऱ्यात घडणाऱ्या घटनांवर आपण अश्रू गाळत असू तेव्हा आपल्याच भाऊ बहिणींना जिवंत जाळलं जाईल. माणूसकीचा विसर पडण्याच्या आत प्रत्येकाने कोणत्याही स्वरुपातील अतिरेकीपणाचा निषेध केला पाहिजे.

आपण केवळ एक प्यादे आहोत जे अदृश्य रेषेच्या आर किंवा पार उभे आहोत. हे ओळखा आणि निष्पाप लोकांना मारलं जात आहे त्यांच्यासाठी उभे राहा.' जान्हवी कपूरशिवाय याआधी रवीना टंडन, दीया मिर्झा, मुनव्वर फारुकी यांनी सुद्धा बांग्लादेशमध्ये होणाऱ्या हिंदूंच्या हत्येवर आक्रोश व्यक्त केला. रिपोर्टनुसार, बांग्लादेशमधील मैमनसिंहच्या भालुका तालिक्यात एक हिंदी कपडा फॅक्टरी मजूर दीपू चंद्र दासला जमावाने मारहाण केली आणि फासावर लटकवून जिवंत जाळलं. या हत्येमध्ये सहभागी असणाऱ्या अनेकांना नंतर अटक करण्यात आली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक

जनसंचलन/ जळगाव जामोद




मुख्यमंत्री महोदयांच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आज उपविभागीय कार्यालय, जळगाव जामोद येथे माझ्या अध्यक्षतेखाली सविस्तर आढावा बैठक पार पडली. बैठकीत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित कामांचा सखोल आढावा घेऊन विविध महत्वाचे निर्णय घेण्यात आले बैठकीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने या योजनेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगण्यात आले की, शेत / पाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत थेट व बारमाही दळणवळणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होऊन खर्चात बचत होईल. यावेळी पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणाचा प्रश्न गंभीर असल्याचे स्पष्ट झाले. अनेक ठिकाणी अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद किंवा पूर्णतः बंद झाल्याने अडथळे निर्माण होत आहेत. यावर उपाय म्हणून महसूल विभागामार्फत प्रत्यक्ष पाहणी करून अतिक्रमणाची अचूक नोंद घेणे, संबंधितांना नोटीस बजावणे, ग्रामपंचायत व स्थानिक पातळीवर जनजागृती करून स्वेच्छेने अतिक्रमण काढण्याचे आवाहन करणे, तसेच आवश्यक ठिकाणी कायदेशीर कारवाई करून रस्ते मोकळे करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. पारदर्शक व योग्य वापर करून कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीत संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने काम करून मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. ही योजना ग्रामीण भागातील शेती व शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला..

# एपीएल शिधापत्रिकांच्या अनुदानासाठी गंगापूर तहसील येथे जोरदार ठीय्या आंदोलन



जनसंचलन/बुलढाणा

धान्य बंद झालेल्या एपीएल शिधापत्रिकाधारकांना अनुदान मिळवून देण्यासाठी लोकसंघर्ष पक्ष गंगापूरच्या वतीने ६आक्टोबर २०२५ रोजी शासनाचे लक्ष एपीएल शिधापत्रिकाधारकांच्या मागण्यांकडे वेधण्यासाठी ठीय्या आंदोलनाची करण्यात आले. लोक संघर्ष पक्षाच्या वतीने दोन तास जोरदार घोषणाबाजी करत तहसील परिसर दणाणून सोडत पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना घाम फोडला.आदोलनाची तीव्रता बघत तालुका पुरवठा अधिकारी मिनल पवार यांनी लेखी पत्र देत एपीएल शिधापत्रिकाधारकांना अनुदान त्वरित वाटप केले जाईल व निवेदनाच्या अनुषंगाने उर्वरित विषयांही न्याय देऊ अंशी माहिती दिली. तत्पूर्वी लोक संघर्ष पक्ष मराठवाडा अध्यक्ष शिवाजी गायकवाड यांनी उपस्थितांना संबोधित करत एपीएल शिधापत्रिकाधारकांच्या प्रश्नांची मांडणी केली.

आपल्या ठीय्या आंदोलनाला आवर्जून उपस्थित असलेले फुलशेवरा ग्रामपंचायत सदस्य कारभारी गवळी साहेब, मुनीर पटेल, हरिचंद्र रावते, ज्ञानेश्वर तोडकर, धनंजय तोडकर, जलील भाई शेख, गणेश भाऊ भुसारे, गणेश भाऊ कळसकर, ज्ञानेश्वर धनुरे आदींसह एपीएल शिधापत्रिका धारक मोठ्या संख्येन उपस्थित होते .

# नाताळच्या सलग सुट्टयांमुळे संतनगरी हाऊसफुल्ल!

## एक लाखाहून अधिक भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन

जनसंचलन/शेगाव



श्री संत गजानन महाराजांचे मंदिरामुळे विदर्भ पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतनगरी शेगावला गुरुवार, शनिवार,व रविवार रोजी ख्रिसमस निमित्त सलग सुट्टी तसेच दिवाळी सारखी नाताळ सणानिमित्त मुंबई पुणे यासह अन्य ठिकाणच्या शाळा महाविद्यालय ऑफिसेसला असणाऱ्या दीर्घकालीन सुट्यांमुळे शेगावला श्रींचे दर्शनास मोठ्या प्रमाणावर भाविक गर्दी उसळली आहे. दरवर्षी शेगावला नाताळमध्ये श्रींचे दर्शनासाठी अनेक ठिकाणाहून भाविक भक्तांचा ओढा मोठ्या प्रमाणावर असतो. श्रींचे दर्शन तसेच आनंद सागर या आध्यात्मिक केंद्राचे अवलोकन करण्यासाठी शेगावला हे भाविक येतात. शेगाव येथे येणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या, एस टी बसेसमधून मोठ्या प्रमाणात प्रवासी बाहेर पडताना दिसतात. यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. श्रींचे दर्शनासाठी भाविकांना सरासरी तीन तास व श्रीमुख दर्शनासाठी ४० मिनिटे अवधी लागत आहे. श्री संस्थानकडून भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे. भाविकांसाठी एकेरी मार्ग करण्यात आला असून मंदिरामध्ये सकाळी १० ते ५ पर्यंत महाप्रसाद हजारो भाविकांनी लाभ घेतला आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात निवास व्यवस्था वारकरी निवास, भक्त निवास विसावा , विहार या ठिकाणी करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारे भक्तांची गैरसोय होऊ नये याची पूर्ण काळजी श्री संस्थानकडून घेतली जात आहे. श्री संस्थांनचे पाकिगमध्ये मोठ्या प्रमाणावर भाविकांची वाहने शिस्तबद्ध उभी असल्याचे दिसून येत आहे .तर मंदिर परिसरात व खाजगी पार्किंग सुद्धा हाऊस फुल झाले आहे.

# इंटरनॅशनल अँचिवर्स अवॉर्ड दे.माळी येथील भागवताचार्य प्रकाश महाराज मगर यांना जाहीर

जनसंचलन/ दे.माळी



दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त इंटरनॅशनल अँचिवर्स अवॉर्ड पुरस्कारांची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी केली असून देऊळगाव माळी, ता. मेहकर, जि. बुलढाणा येथील भागवताचार्य, कीर्तनकार, ह.भ.प. प्रकाश महाराज मगर यांच्या धार्मिक, अध्यात्मिक, सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेवून त्यांना इंटरनॅशनल अँचिवर्स अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे. प्रकाश महाराज मगर यांनी गेल्या पन्नास वर्षापासून किर्तन, भारुड, लोककला, भजन, भागवत कथा, व विविध माध्यमातून अनिष्ठ रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, जात धर्म भेदभाव, यावर प्रखर प्रहार करत समाज जागृती करीत आहे.हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभ मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २.३० वा. हॉटेल शांतीकमल, शिर्डी येथे होणार आहे. हा कार्यक्रम अतिविशिष्ट मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिला/पुरुष यांचा या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये भागवताचार्य, ह.भ.प. प्रकाश महाराज मगर यांचा समावेश असून त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार संघातर्फे करण्यात आले आहे.



# संसाराची जबाबदारी अन् खाकी वर्दीचे स्वप्न....!

## प्रेरणादायी यशः दोन मुले, संसार सांभाळून महिला झाली पोलीस उपनिरीक्षक...!

**जनसंचलन/ बुलढाणा**

कष्ट, समर्पण आणि जिद्द यांच्या जोरावर कोणत्याही परिस्थितीत यश मिळवता येते, हे एका महिलेने सिद्ध केले आहे. दोन मुलांचा आणि संसाराचा गाडा हाकत असतानाच, परीक्षा मार्फत तिने पोलीस उपनिरीक्षक () पदाची परीक्षा उत्तीर्ण करून एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाची कहाणी हजारो महिलांसाठी प्रेरणास्रोत ठरली आहे. विवाहानंतर घर-कुटुंब हीच प्राथमिकता मानली जात असताना, वैशाली यांनी तिच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न आणि खाकी वर्दीतील नोकरीची महत्त्वाकांक्षा कायम ठेवली. दोन लहान मुलांची काळजी घेणे, घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे आणि त्याच वेळी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणे हे तिच्यासाठी मोठे आव्हान होते. ही यशस्वी गाथा बुलढाणा जिल्ह्याच्या लाडकी लेक वैशाली गणेश पाटील, ज्या एकेकाळी रोज ४ किलोमीटर पायी शाळेत जात होत्या, आज महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत झाल्या आहेत. त्यांचा हा प्रवास केवळ प्रेरणादायी नाही, तर खऱ्या अर्थाने जिद्द, चिकाटी आणि स्वप्नपूर्तीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांचाफ्र एक उत्तम उदाहरण आहे. वैशाली यांचे १ली ते ४थी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद शाळा पिंपळवाडी, ता. चिखली येथे झाले, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण जानकीदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देऊळगाव घुबे, ता. चिखली येथे पूर्ण केले. या शाळेत जाण्यासाठी रोज पिंपळवाडी ते देऊळगाव घुबे ४ किमी पायी प्रवास करणे, हे त्यांच्या जीवनातील एक सामान्य दृश्य होते ;पण त्या दृश्यामागे एक असामान्य ध्येय होते. खो-खो या खेळात वैशाली राष्ट्रीय स्तरावर खेळल्या आहेत आणि त्यांनी रजत पदक पटकावले आहे. ही केवळ खेळातील यश नव्हती, तर त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शक्तीची साक्ष होती. जी पुढे पोलीस सेवेत त्यांना खूप कामी आली.

पोलीस अधिकारी बनण्याचा प्रवास. लग्न झाल्यानंतर, दोन मुले आणि घर-संसार सांभाळत असतानाही त्यांनी ची तयारी सुरू ठेवली. २०२० मध्ये पहिल्या प्रयत्नात अपयश आले, पण त्यांनी हार मानली नाही. दुसऱ्या प्रयत्नात २०२१ मध्ये त्यांनी क्लिअर केली आणि पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांची निवड झाली. दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी नाशिक येथे त्यांच्या पोलिस उपनिरीक्षक म्हणून खडतर प्रशिक्षणाल सुरुवात झाली होती. २४ डिसेंबर २०२५ रोजी वैशाली यांनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करीत महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारला. त्यांच्या या यशाचे श्रेय त्या आपले पती श्री. गणेश गोविंद पाटील आणि आई-वडील आणि माझ्या आयुष्यातील सगळे गुरुवर्य यांना देत.माझ्या यशामागे माझ्या कुटुंबाचा खूप मोठा सहभाग ,आणि मोलाची साथ आहे,फ्र आम्हा सर्वांच्या एकत्रित मेहनत, जिद्द आणि स्वप्नपूर्तीसाठी केलेल्या प्रयत्नांचा हा विजय आहे!असे वैशाली पाटील म्हणाल्या.




# बाल शिवाजी कॉन्व्हेंट च्या चिमुकल्यांनी आपल्या कला कौशल्याने उपस्थितांना केले मंत्रमुग्ध...




**जनसंचलन/बुलढाणा**

डॉ.पंजाबराव देशमुख उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती महोत्सवा निमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित बुलढाणा शहरातील बाल शिवाजी कॉन्व्हेंट मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचाही समावेश होता.. या कार्यक्रमांमध्ये भारतीय आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे विविध पारंपारिक पोशाख, देशभक्तीपर गीतांवर नृत्य, यासह इतर कला कौशल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उपस्थित पाहुणे आणि पालकांचे लक्ष वेधून घेतले होते.. या मंत्रमुग्ध कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.. पाहुयात याच कार्यक्रमाची झलक...




# शहरात दहशत माजवणारा कुख्यात आरोपी आरिफ खानवर एमपीडीए अंतर्गत पोलिसांची धडक कारवाई

**जनसंचलन/मलकापूर**

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गेल्या काही दिवसांपासून अनेक दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत त्या टोळ्यांमुळे समाजामुळे मध्ये भीतीच वातावरण निर्माण करून स्वतः ची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे तसाच काहीसा प्रकार विदर्भाच्या प्रवेशद्वारी मलकापूर येथे घडत होता त्यानिमित्त सविस्तर माहिती अशी की, मलकापूर शहरात सातत्याने दहशत निर्माण करणाऱ्या कुख्यात आरोपी आरिफ खान उर्फ खेबड्या कौसर खान याच्यावर अखेर महाराष्ट्र झोपडपट्टीदादा प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. मलकापूर शहर पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावास जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून आरोपीला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. आरिफ खान (वय २४, रा. माळीपुरा, मलकापूर) हा गेल्या २०२३ पासून गुन्हेगारी कारवायांमध्ये सक्रिय असून त्याच्यावर मलकापूर शहर पोलीस ठाण्यात मारहाण, जीवघेणा हल्ला, शस्त्रांचा वापर, दहशत निर्माण करणे, सार्वजनिक शांततेचा भंग अशा गंभीर स्वरूपाचे एकूण ८ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिक उघडपणे तक्रार देण्यासही घाबरत असल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आली होती. यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असतानाही त्याच्या वर्तनात कोणताही सुधार झाला नाही. त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी त्याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करणे आवश्यक असल्याचा अहवाल मलकापूर शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांनी सादर केला. हा प्रस्ताव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वारे यांच्या सूचनेनुसार तयार करून पोलीस अधीक्षक निलेश तांबे (बुलढाणा) यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी प्रस्तावाचे अवलोकन करून तो मंजूर केला आणि आरोपी आरिफ खान याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये पोलीस निरीक्षक गणेश गिरी, स.पो.नि. दीपक वारे, पोलीस अंमलदार आसिफ शेख (३११), योगेश तायडे (२६५४), संतोष कुमावत (१०१३), प्रविण गवई (२७३२), नवल राठोड (१३४६) व आनंद माने (१२५४) यांनी सहभाग घेतला. या कठोर कारवाईमुळे मलकापूर शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८